# विद्यार्थ्यांना हॉलतिकीट मिळणार मेलद्वारे

## मोबाईल क्रमांक करावा लागणार अपडेट


कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. असे असले तरी विद्यार्थ्यांना त्यांचे हॉलतिकीट, वेळापत्रक मेलद्वारे दिले जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात आपला ई-मेल आय.डी. आणि मोबाईल क्रमांक अपडेट करावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षा आणि बॅकलॉगची परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होईल. यासाठी हॉलतिकीट आणि परीक्षेचे वेळापत्रक तसेच अन्य माहिती ही मेलद्वारे देण्यात येईल. परीक्षेसंदर्भातील अद्ययावत माहिती, बदल मोबाईलवर एस.एम.द्वारे पाठवले जातील. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात जाऊन आपला ई-मेल, मोबाईल क्रमांक अपटेड करावा. विद्यार्थ्यांच्या नियमीत जवळ असणारा मोबाईल क्रमांक द्यावा, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका संबंधित महाविद्यालय, अधिविभागातील शिक्षकांकडून तयार करून घेतल्या जाणार आहेत. महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर आयोजित परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत भरावयाचे आहेत. परीक्षेच्या अनुषंगाने संपूर्ण कार्यवाही महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर करण्यात येणार आहे, अशा सूचना दिल्या आहेत.

### दूरशिक्षण केंद्रांना परिपत्रक

दूरशिक्षण अभ्यासकेंद्राकडे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही परीक्षेसाठी ई-मेल व मोबाईल क्रमांक संबंधित अभ्यासकेंद्राकडून १७ सप्टेंबरपर्यंत अद्ययावत करून घ्यावा. एखाद्या महाविद्यालयात दूरशिक्षण अभ्यासकेंद्राकडील विषय शिकविला जात नसल्यास जवळच्या महाविद्यालयातील शिक्षकांकडून प्रश्नपत्रिका तयार करून घ्याव्यात. गुण संगणक प्रणालीमध्ये भरावेत. याबाबत मार्गदर्शन घ्यावे अशा सूचनांचे परिपत्रक काढले आहे.

**विसाव्या शतकामध्ये सांख्यिकी पद्धती विकसित करून, अनेक प्रश्नांची उकल करण्याचे कार्य जगात ज्या मोजक्या लोकांनी प्रभावीपणे केले, त्यामध्ये प्रा. सी. आर. राव यांचे नाव अग्रभागी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर थोर संख्याशास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने...**



# सी. आर. राव : एक नंदादीप !

व्यक्तिविशेष

प्रा. डी. टी. शिर्के

विख्यात संख्याशास्त्रज्ञ प्रा. सी. आर. राव यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने जगभरातील संख्याशास्त्र विषयाशी संबंधित विविध विद्यापीठे व संशोधन संस्थांनी वर्षभर विविध उपक्रम आयोजित केले आहेत. प्रा. राव यांनी सेवानिवृत्तीपर्यंत प्रख्यात भारतीय सांख्यिकी संस्थेसाठी भरीव योगदान दिले. त्यानंतर ते गेली चाळीस वर्षे अमेरिकेत संशोधक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधनाचा पाया भारतीय सांख्यिकी संस्थेमध्ये रचला गेला. गणितामध्ये विशेष आवड असणारे प्रा. राव हे अपघाताने संख्याशास्त्र विषयाकडे वळले आणि 'न भूतो न भविष्यती' असे दिशादर्शक, मूलभूत कार्य त्यांनी केले.

कर्नाटकातील हडगल्ली येथे १० सप्टेंबर, १९२० रोजी प्रा. राव यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सी. डी. नायडू पोलिस अधिकारी होते. आई लक्ष्मीकांतम्मा गृहिणी होत्या. या दाम्पत्याचे राव हे आठवे अपत्य. म्हणूनच त्यांचे नाव राधाकृष्ण ठेवले असावे. वडिलांच्या सरकारी नोकरीत होणाऱ्या बदल्यांमुळे कुटुंबाला वारंवार स्थलांतरित व्हावे लागे. त्यामुळे राव यांचे शालेय शिक्षण विविध ठिकाणी झाले. वडिलांना आपल्या मुलाने गणितात पीएच.डी. मिळवावी असे वाटे. परंतु दुर्दैव असे की, राधाकृष्ण यांनी गणित विषयात बी.ए. प्रथम क्रमांकाने पूर्ण केलेले पाहण्यास वडील हयात नव्हते. एकोणिसाव्या वर्षी पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर राधाकृष्ण संशोधनाकडे वळले. परंतु शिष्यवृत्ती मिळण्यात काही तांत्रिक अडचणी आल्या. त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्याचे ठरविले. मात्र तेथेही लहान वय आडवे आले. दरम्यान, भूगर्भ सर्वेक्षण विभागामध्ये गणितज्ज्ञाच्या जागेसाठी त्यांनी अर्ज केला. मुलाखतीसाठी कलकत्त्याला ते गेले. येथेही कमी वयामुळे नकारघंटा ऐकावयास मिळाली. परंतु हीच मुलाखत राधाकृष्ण यांच्या आयुष्यात मोठी संधी घेऊन आली. कलकत्यातील ज्या हॉटेलमध्ये राधाकृष्ण उतरले होते, तेथे सुब्रमणियम नावाचे एक गृहस्थ त्यांना भेटले. ते मुंबईहून प्रशिक्षण घेण्यासाठी भारतीय सांख्यिकी संस्थेत आले होते. प्रशिक्षणादरम्यान ते वास्तव्यास त्या हॉटेलवर होते. त्यांनी राधाकृष्ण यांना भारतीय सांख्यिकी संस्थेविषयी विस्तृत माहिती दिली. प्रा. पी. सी. महालनोबीस या पदार्थविज्ञान विषयाच्या प्राध्यापकाने सुरू केलेली ही संस्था व त्याचे महत्त्व हे राधाकृष्ण यांची संख्याशास्त्राबद्दल उत्सुकता वाढवणारे ठरले. राधाकृष्ण यांचे मोठे भाऊ डॉ. व्यंकटेशराव व त्यांच्या आईने त्यांना कलकत्याच्या त्या संस्थेत जाण्यासाठी लागणारा खर्च करण्याची तयारी दर्शवली आणि राधाकृष्ण यांचा संख्याशास्त्राच्या विश्वात प्रवेश झाला. त्या क्षणापासून पुढे ते कार्य करत राहिले. ते राधाकृष्णचे प्रा. सी. आर. राव झाले. आज जगभर ते संख्याशास्त्राचे गाढे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. संख्याशास्त्रात भारतातील पहिला पदव्युत्तर अभ्यासक्रम कलकत्ता विद्यापीठात १९४१ साली सुरू झाला. राधाकृष्ण या पहिल्या बॅचचे विद्यार्थी. संख्याशास्त्र विषयात त्यांनी प्रथम क्रमांकासह कलकत्ता विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी मिळविली. १९४८ मध्ये केंब्रिज विद्यापीठातून डॉ. रोनाल्ड ए. फिशर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट मिळविली. त्याच विद्यापीठाने १९६५ मध्ये त्यांना डी.एससी. पदवी बहाल केली. आजवर त्यांना जगभरातील विख्यात ३८ विद्यापीठांनी मानद डॉक्टरेट पदव्या प्रदान केल्या आहेत.

१९४३ मध्ये राधाकृष्ण भारतीय सांख्यिकी संस्थेत अधीक्षक संख्याशास्त्रज्ञ या पदावर रुजू झाले. त्यावेळी डॉ. वि. म. दांडेकर हे त्या संस्थेत विद्यार्थी होते. त्यांनी प्रा. राव यांना एक प्रश्न विचारला. या प्रश्नावर प्रा. राव यांनी त्याच रात्री काम केले आणि उत्तर शोधले. ते दुसऱ्या दिवशी वर्गात सांगितले. दांडेकर यांना दिलेले ते उत्तर म्हणजेच प्रा. राव यांचा पहिला शोधनिबंध ठरला. याच संस्थेत प्राध्यापक, विभागप्रमुख, संचालक अशा विविध पदावर त्यांनी काम केले. या संस्थेत कार्यरत असतानाच प्रा. राव यांना केंब्रिज विद्यापीठात एका विशेष प्रकल्पासाठी पाठविण्यात आले. डॉ. फिशर त्याच विद्यापीठात अनुवांशिकताशास्त्र विषयात संशोधन करत होते. राधाकृष्ण यांनी त्यांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन करण्याबद्दल विनंती केली. त्यांनी ती मान्य केली. पीएच.डी. प्राप्त केल्यानंतर डॉ. राव भारतात आले. त्यांनी आपले संशोधन भारतीय सांख्यिकी संस्थेत सुरू ठेवले. वयाची तीस वर्षे पूर्ण होण्यापूर्वी राव यांनी ४० वर संशोधन लेख प्रसिद्ध केले. त्यांनी अनेक मूलभूत संकल्पनांवरील संशोधन पूर्णत्वास नेले. क्रेमर-राव इनइक्विलिटी, राव-ब्लॅकवेल सिद्धांत, लेहमन-शेफल सिद्धांत, राव स्कोअर टेस्ट, नेमन-राव टेस्ट, एफ-टेस्ट, राव'ज डिस्टन्स इत्यादींना संख्याशास्त्राच्या संशोधन व त्याची उपयोगिता या दोन्हीमध्ये अढळ स्थान आहे. भारत सरकारने त्यांच्या संख्याशास्त्रातील संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांचा १९६८ मध्ये पद्मभूषण व २००१ मध्ये पद्मविभूषण पुरस्कार देऊन सन्मान केला. तसेच त्यांना भटनागर पुरस्कार, राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार, मेघनाथ साहा पदक, जे. सी. बोस सुवर्ण पदक, श्रीनिवास रामानुजन पदक यांसह अनेक सन्मान प्राप्त झाले. मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिस्टिक्स अँड प्रोग्राम इंप्लिमेंटेशन मंत्रालयाने संख्याशास्त्र विषयात योगदान देणाऱ्या व्यक्तीस प्रा. राव यांच्या गौरवार्थ राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला. तसेच हैदराबाद येथे सी. आर. राव इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स, स्टॅटिस्टिक्स अँड कॉम्प्युटर सायन्स सुरू करण्यात आली आहे. परदेशातील विविध नामवंत संस्थांनी फेलोशिप व सदस्यत्व देऊन त्यांना सन्मानित केले आहे. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकेमार्फत विज्ञान क्षेत्रात दिले जाणारे सर्वोच्च नॅशनल मेडल ऑफ सायन्स हा पुरस्कार देऊन प्रा. राव यांचा सन्मान केला. रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटी इंग्लंडने रौप्य व सुवर्णपदक त्यांना प्रदान केले. प्रा. राव यांनी भारतीय सांख्यिकी संस्थेत त्यांच्या निवृत्तीपर्यंत सेवा केली. काही वर्षांनंतर म्हणजे १९७९ साली पीटस्बर्ग विद्यापीठात ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यानंतर ते अमेरिकेमध्ये प्राध्यापक पदावर कार्यरत राहिले.

# विद्यार्थ्यांना हॉलतिकीट मिळणार मेलद्वारे

## मेल, मोबाईल क्रमांक अद्ययावत करा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार असून, त्यांचे हॉलतिकीट, वेळापत्रक मेलद्वारे दिले जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन आपला ई-मेल आय.डी. आणि मोबाईल क्रमांक अद्ययावत करावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षा आणि बॅकलॉगची परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरु होईल. हॉलतिकीट आणि परीक्षेचे वेळापत्रक, तसेच अन्य माहिती ही मेलद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येईल. तसेच परीक्षेसंदर्भातील अद्ययावत माहिती, बदल मोबाईलवर एस.एम.द्वारे पाठवले जातील. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत: महाविद्यालयात जाऊन आपला ई-मेल, मोबाईल क्रमांक अद्ययावत करावा. विद्यार्थ्यांच्या नियमित जवळ असणारा मोबाईल क्रमांक द्यावा, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका संबंधित महाविद्यालय, अधिविभागातील शिक्षकांकडून तयार करून घेतल्या जाणार आहेत.

महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर आयोजित परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत भरावयाचे आहेत. दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही परीक्षेसाठी ई-मेल व मोबाईल क्रमांक संबंधित अभ्यासकेंद्राकडून १७ सप्टेंबरपर्यंत अद्ययावत करून घ्यावा. अशा सूचनांचे परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी महाविद्यालये व अधिविभागांना काढले आहे.

# कुलगुरू पदासाठी २८ जणांची यादी

## १६९ जणांचे अर्ज; २६, २७ ला मुलाखतींमधून निवडणार अंतिम ५ जण



सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. या पदासाठी एकूण १६९ अर्ज आले होते. त्यातील २८ जणांनी निवड पहिल्या यादीत करण्यात आली आहे. यामध्ये विद्यापीठातील प्रा. डॉ. विजय फुलारी, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचा समावेश आहे. या शिवाय प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे (सांगली), प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवल (सातारा) या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांचीही निवड झाली आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाल १७ जूनला संपला. त्यानंतर शोध समिती गठित केली. कुलगुरू पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. या पदासाठी १६९ अर्ज आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील बारा ते पंधरा प्राध्यापकांनी अर्ज केले होते.

तसेच राज्यातील विविध विद्यापीठातून अर्ज आले होते. याशिवाय दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातूनही काही प्राध्यापकांनी अर्ज केले होते. अर्जांची छाननी करून २८ जणांची यादी तयार केली.

सर्वांची २६ आणि २७ सप्टेंबर रोजी व्हिडिओकॉन्फरन्सद्वारे मुलाखत घेतली जाणार आहे. त्यानंतर त्यातून पाच जणांची निवड करण्यात येईल. या पाच जणांमधून कुलपती (राज्यपाल) एका व्यक्तीची कुलगुरू म्हणून निवड करतील.

### पहिल्या यादीतील नावे

डॉ. के. सी. देशमुख (नागपूर), डॉ. जी. एन. शिंदे (नांदेड), डॉ. प्रदीप कुंडले (नागपूर), डॉ. एस. बी. देओसरकर (बाटू, लोणेरे), डॉ. अंजली कुरणे (पुणे), डॉ. अनुभा खाले (एस.एन.डी.टी), डॉ. एल. एम. वाघमारे (नांदेड), डॉ. डी. जी. कणसे (सांगली), डॉ. एम. बी. मुळ्ये (औरंगाबाद), डॉ. दीपक पानसकर (नांदेड), डॉ. आर. व्ही. शेजवल (सातारा), डॉ. मिलिंद उमेकर (नागपूर), डॉ. नितीन देसाई (मुंबई), डॉ. अविनाश कुंभार (पुणे), अनिराव पैला (बेंगलुरू), डॉ. विजय फुलारी (कोल्हापूर), डॉ. दिलीप पांगव्हणे (नाशिक), डॉ. आर. एस. अवसाठी (लातूर), डॉ. डब्ल्यू. के. सरवदे (औरंगाबाद), डॉ. पी. पी. माहुलीकर, डॉ. डी. टी. शिर्के (कोल्हापूर), डॉ. रवींद्र परदेशी (पुणे), डॉ. संजीव सोनवणे (पुणे), डॉ. विनायक देशपांडे (नागपूर), डॉ. बी. पी. रंधे (पंढरपूर), डॉ. आनंद भालेराव (पुणे), डॉ. गीता लाटकर (नांदेड), डॉ. एम. व्ही. काळे (औरंगाबाद)

# कुलगुरूपदाच्या मुलाखतीसाठी २५ जणांची नावे निश्चित

## व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे २६ व २७ रोजी मुलाखती



**शिवाजी विद्यापीठातून...**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेंतर्गत शोध समितीकडून मुलाखतीसाठी २५ उमदेवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. २६ व २७ सप्टेंबर रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संबंधित उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत.

तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पदाचा कार्यकाल १७ जून रोजी संपला. त्यानंतर कुलपती कार्यालयाकडून कुलगुरू निवड प्रक्रियेंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमण्यात आली. २ जुलैपर्यंत इच्छुक उमदेवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले. यात कोल्हापूर, सांगली, पुणे, मुंबई, औरंगाबाद, जळगावसह जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापक, प्राचार्य यांचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सांगलीतील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभागातील डॉ. व्ही. जे. फुलारे, पुणे विद्यापीठातील डॉ. संजीव सोनवणे, पुणे विद्यापीठ अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, प्रा. डॉ. अविनाश कुंभार, जळगाव विद्यापीठाचे डॉ.पी. पी. माहुलीकर, डॉ. के. सी. देशमुख (नागपूर), माजी प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे (नांदेड), डॉ. प्रदीप कुंडाल (नागपूर), नांदेड विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील डॉ. एम. बी. मुळे, नांदेड विद्यापीठाचे डॉ. दीपक पानसकर, डॉ. नितीन देसाई (मुंबई), अनिल राव (बेंगलोर), डॉ. आर. एस. अवस्थी (लातूर), डॉ. डब्ल्यू. के. सरवदे (औरंगाबाद), डॉ. रवींद्र परदेशी (पुणे), माजी प्र-कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे (नागपूर), भारती विद्यापीठ पुणेचे डॉ. आनंद भालेराव, डॉ. गीता लाटकर (नांदेड), डॉ. एम. व्ही. काळे (औरंगाबाद) आदींची नावे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांच्या यादीत असल्याचे समजते.

# अंतिम वर्ष नियमित अभ्यासक्रमांच्या १० ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा

## परीक्षा विभागाकडून तारखा जाहीर; १ ऑक्टोबरपासून बॅकलॉगच्या परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने अंतिम वर्ष शेवटचे सत्र आणि बॅकलॉगच्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार सर्व नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षा १० ऑक्टोबर व बॅकलॉगच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत.

विद्यापीठ परीक्षा विभागाकडून अंतिम वर्ष शेवटचे सत्र, बॅकलॉगच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यासाठी तयारी सुरू झाली आहे. अंतिम वर्षाचे शेवटचे सत्र व बॅकलॉग मिळवून ५८० हून अधिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

नियमित विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ऑक्टोबरपासून सुरू होणार असून वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना वेळापत्रक व हॉलतिकीट संगणक प्रणालीतून उपलब्ध करून दिले जाणार आहे. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा ५० गुणांची, एक तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली पद्धतीने ऑनलाईन, ऑफलाईन स्वरूपात संगणक प्रणालीमधून घेण्यात येणार आहे.

परीक्षा ऑनलाईन संगणक प्रणालीतून होणार असल्याने परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक



**शिवाजी विद्यापीठातून...**

महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीत १७ सप्टेंबरपर्यंत अपडेट करणे गरजेचे आहे. दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही परीक्षेसाठी ई-मेल व मोबाईल क्रमांक संबंधित अभ्यास केंद्राकडून १७ सप्टेंबरपर्यंत अद्ययावत करून घ्यावा लागणार आहे.

अंतिम वर्षास प्रवेशित व अनुपेश (बॅकलॉग) असलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे.

दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा ज्या-त्या महाविद्यालय अभ्यास केंद्रावर घेण्यात येणार आहे. संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकांकडून तयार करण्यात येणार आहेत, असे परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी महाविद्यालये, अधिविभागांना दिले आहे.

### तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा, प्रकल्प परीक्षा १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गुण संगणक प्रणालीत भरण्यासाठी आवश्यक लिंक १५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत उपलब्ध असणार आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलविता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा अधिविभागप्रमुख, प्राचार्य यांना देण्यात आली आहे. परीक्षा घेताना सध्या असणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या कमाल गुणांमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये, अशा सूचना आहेत.

कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन परीक्षांची पद्धत अवलंबण्यात यावी. परीक्षेसाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा, अशा सूचना परिपत्रकात करण्यात आल्या आहेत.